Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA





Volume - IX, Issue - I
January - March - 2020
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - I

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877
E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399** (www.sjifactor.com)

Scanned with OKEN Scanner

# EDITORIAL BOARD


| | |
|---|---|
| **Professor Kaiser Haq**<br>Dept. of English, University of Dhaka,<br>Dhaka 1000, Bangladesh. | **Roderick McCulloch**<br>University of the Sunshine Coast,<br>Locked Bag 4, Maroochydore DC,<br>Queensland, 4558 Australia. |
| **Dr. Ashaf Fetoh Eata**<br>College of Art's and Science<br>Salmau Bin Adbul Aziz University, KAS | **Dr. Nicholas Loannides**<br>Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,<br>Faculty of Computing, North Campus,<br>London Metropolitan University, 166-220 Holloway Road,<br>London, N7 8DB, UK. |
| **Muhammad Mezbah-ul-Islam**<br>Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of<br>Information Science and Library Management<br>University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh. | **Dr. Meenu Maheshwari**<br>Assit. Prof. & Former Head Dept.<br>of Commerce & Management<br>University of Kota, Kota. |
| **Dr. S. Sampath**<br>Prof. of Statistics University of Madras<br>Chennari 600005. | **Dr. D. H. Malini Srinivasa Rao**<br>M.B.A., Ph.D., FDP (IIMA)<br>Assit. Prof. Dept. of Management<br>Pondicherry University<br>Karaikal - 609605. |
| **Dr. S. K. Omanwar**<br>Professor and Head, Physics,<br>Sat Gadge Baba Amravati<br>University, Amravati. | **Dr. Rana Pratap Singh**<br>Professor & Dean, School for Environmental<br>Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar<br>University Raebareily Road, Lucknow. |
| **Dr. Shekhar Gungurwar**<br>Hindi Dept. Vasantrao Naik<br>Mahavidyalaya Vasarni, Nanded. | **Memon Sohel Md Yusuf**<br>Dept. of Commerece, Nirzwa College<br>of Technology, Nizwa Oman. |
| **Dr. S. Karunanidhi**<br>Professor & Head,<br>Dept. of Psychology,<br>University of Madras. | **Prof. Joyanta Borbora**<br>Head Dept. of Sociology,<br>University, Dibrugarh. |
| **Dr. Walmik Sarwade**<br>HOD Dept. of Commerce<br>Dr. Babasaheb Ambedkar Marathwada<br>University, Aurangabad. | **Dr. Manoj Dixit**<br>Professor and Head,<br>Department of Public Administration Director,<br>Institute of Tourism Studies,<br>Lucknow University, Lucknow. |
| **Prof. P. T. Srinivasan**<br>Professor and Head,<br>Dept. of Management Studies,<br>University of Madras, Chennai. | **Dr. P. Vitthal**<br>School of Language and Literature<br>Marathi Dept. Swami Ramanand<br>Teerth Marathwada University, Nanded. |


Scanned with OKEN Scanner

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. V. N. Bhosale**
Principal
Shivaji Art's Commerce & Science College, Kannad

**Dr. B. K. Magar**
Vice-Principal
Shivaji Art's Commerce & Science College, Kannad.

**Dr. Ahire P. B.**
Shivaji Art's Commerce & Science College, Kannad

**Dr. Bhelonde J. V.**
Shivaji Art's Commerce & Science College, Kannad.

**Prof. Bhalerao S. K.**
Shivaji Art's Commerce & Science College, Kannad

**Dr. Gorde S. A.**
Shivaji Art's Commerce & Science College, Kannad.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २७ | वर्तमानात महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची आवश्यकता<br>**डॉ. नानासाहेब भाऊसाहेब दाभाडे** | ११५-११९ |
| २८ | महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार<br>**सचिन बाबुराव मुंडे** | १२०-१२४ |
| २९ | सद्यकालीन परिस्थीतीमध्ये तुकडोजी महाराजांच्या विचारांची उपयुक्तता<br>**शुंभागी विजयराज मोहोड** | १२५-१३० |
| ३० | वर्तमान काळात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचार आणि कार्याची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. अनिल म्हाळाप्पा गाडेकर** | १३१-१३५ |
| ३१ | वर्तमान काळात राजर्षी शाहु महाराज यांच्या विचारांची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. पंडीत गडकरी** | १३६-१३७ |
| ३२ | राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक विचार व कार्य<br>**प्रा. डॉ. संजय बाबुराव वाकळे** | १३८-१४० |
| ३३ | महात्मा बसवेश्वरांच्या सामाजिक विचारांची प्रासंगिकता<br>**प्रा. डॉ. अप्पाराव चंद्रराव गायकवाड**<br>**प्रा. डॉ. आदमाने भाऊसाहेब बंकट** | १४१-१४४ |
| ३४ | महात्मा ज्योतिबा फुले यांचे अस्पृश्य विषयक विचार<br>**प्रा. नवानाथ ज्ञानोबा पवळे** | १४५-१४८ |
| ३५ | सशक्त व समर्थ राष्ट्र बांधणीसाठी स्वामी विवेकानंदाच्या विचाराची उपयुक्तता<br>**डॉ. संतोष सुधाकरराव कोदुरवार** | १४९-१५२ |




Scanned with OKEN Scanner

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# २७. वर्तमानात महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची आवश्यकता

डॉ. नानासाहेब भाऊसाहेब दाभाडे
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, म. स. गा. कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगाव जि. नाशिक.

जगात कोणतीही सुधारणा एकदम सर्वांना मान्य होते असे कधी होत नाही. नेहमी सुरूवात थोड्यापासून होते आणि जेव्हा थोड्यांचा खंबिरपणा पुष्कळजण पाहतात तेव्हा त्यांचे ते अनुकरण करतात. या विचारांची प्रेरणा व अमंलबजावणी सर्व देशभर करून सामान्यातील - सामान्य गरीबातील गरीब लोकांना जागृत करण्याचे महान कार्य महात्मा गांधींनी केले. त्यांच्या सत्य, अहिंसा, सर्वोदय, धर्म, ग्रामोद्योग यावर मांडलेल्या राष्ट्र उभारणीच्या विचारामध्येच गांधीजींचे आर्थिक विचार भारतातच नव्हे तर जगात दिसून येतात. आर्थिक विकासाची भावना जनतेत रूजवत असतांना त्यांनी सर्व जाती - धर्मातील राज्यकर्ते, समाजसुधारक, विचारवंत व सर्वसामान्य जनतेत सर्वप्रथम आपल्या देश भक्तीविषयी, आपल्या कर्तव्याविषयी व एकूण आपल्या देशासाठी आणि स्वत:साठी चांगले कार्य करता येईल या विचारांची बिजे पेरली.

ग्रामस्वातंत्र्य व स्वावलंबन हा गांधीजींच्या आर्थिक विचारांचा पाया होता. प्रत्येक गाव स्वातंत्र्य प्रजासत्ताक व स्वयंपूर्ण असावे असा त्यांचा आदर्श विचार होता. यातूनच माजी दिवंगत राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी PURA (Provision of Urban Amenities to Rural Areas) नावाचे प्रतिमान तयार केलेल व त्यातुन भारत जागतीक महासत्ता कसा बनेल अशी व्यूहरचना तयार केली. परंतू ती व्यूहरचना फक्त कागदोपत्री अस्तित्वात आली. त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नाही.

**उद्दीष्टे**

१. जनसहकार्यातुन आर्थिक विकास साध्य करण्याच्या महात्मा गांधीजींच्या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. महात्मा गांधीजींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता अभ्यासणे.



Scanned with OKEN Scanner

संशोधन पध्दती

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. त्यासाठी विविध संदर्भ ग्रथांचा वापर करण्यात आलेला आहे.

धर्म संस्था व अर्थ

गांधीजींच्या मते राजकारण, आर्थिक प्रगती या सर्व बाबी वेगवेगळ्या नाहीत. त्या सर्व धर्मामध्ये समाविष्ट आहेत. म्हणून या संस्थेचे नियामक राजकारण, अर्थशास्त्र, समाजसुधारणा इत्यादिंचे अध्ययन व अध्यापन धर्मबुध्दीने करावे आणि आपल्या अंगी असलेला सर्व उत्साहानिशी या क्षेत्रात कार्य करावे. त्यामुळे देशाची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

सहकारी तत्व आणि आर्थिक विकास

महात्मा गांधीजींच्या मते जर सहकाराच्या माध्यमातून आर्थिक विकास साधावयाचा असेल तर सहकारी तत्त्वाच्या अज्ञानावर उभारलेली नकली सहकाराची इमारत कितीही भव्य असली तरी ती व्यर्थ आहे. त्यासाठी नैतिक दृष्टी ठेवणाऱ्या खऱ्या सहकारी चळवळीची आवश्यकता आहे. म्हणजेच गांधीजींच्या मते ही सहकारी चळवळ नैतिकदृष्ट्या शुध्द राहु इच्छिणाऱ्या माणासापुरती मर्यादित असावी जेणे करून जनतेच्या हिताचे निर्णय व कामे सहकाराच्या माध्यमातून घडवून आणता येईल व जनतेचा आर्थिक विकास करण्यास मदत होईल.

गांधीजींच्या मते देशात पापी, बलाढ्य संस्था इतर वित्तीय संस्था व सावकार यांचे प्रमाण मोठे आहे हे सहकारी तत्वावर शंका घेतात व त्यावर पकड निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. परंतु ते यावर पकड निर्माण करू शकत नाही. कारण जर सहकारी चळवळ नैतिक स्वरूपाचे काम करत असेल तर या बलाढ्य संस्था सहकाराला शरण येतात. यावरून असे समजते की, आजच्या परिस्थित मृत्यूपंथास गेलेल्या सहकाराला गांधीजींच्या या नैतिक विचारांच्या सामर्थ्यातून पुन्हा उभे राहणे शक्य होईल. परंतू त्यासाठी जनतेमध्ये निती - मुल्य रूजवण्याची आवयश्यकता आहे.

शिक्षण पध्दती आणि चिरस्थायी आर्थिक विकास

महात्मा गांधीजींच्या मते (3 जुलै 1917) सध्या भारतात रूढ होत असलेली शिक्षण पध्दती भारताच्या गरजा भागविण्यास पूर्णपणे असमर्थ आहे ती पाश्चात्यांची भिकार नक्कल आहे. परभाषेचे माध्यम असल्यामुळे या शिक्षण पध्दतीने शाळा - कॉलेजातून बाहेर पडणाऱ्या तरूणांची शक्ती शोषून घेतली आहे. आणि कारकून व कचेरीतील अधिकारी यांची सेना निर्माण केली आहे.

या शिक्षण पध्दतीमुळे सारी स्वतंत्र बुध्दी आटली आहे. देशी भाषा खंक झाल्या आहेत. त्या मृत्यूपंथास चालल्या आहेत. आणि सुशिक्षित वर्गाचा संबध आल्यामुळे जे उच्च ज्ञान जनेमध्ये झिरपले असते त्याला ती जनता मुकली आहे. सुशिक्षीत भारत व जनता यांच्यामध्ये या पध्दतीमुळे एक खिंड निर्माण झाली आहे. वस्त्रोद्योग नसल्यामुळे शरीर क्षीण झाले आणि शिक्षणाला धार्मिक अधिष्ठान नसल्यामुळे त्याने मेंदू चेतविला असला तरी आत्मा उपाशी राहिला. या अभ्यासक्रमात नाव घेण्यासारखे शेती - शिक्षण मुळीच दिले जात नाही. त्यामुळे भारताच्या सर्वात मोठ्या गरजेकडे कानाडोळा केला जात आहे. हा मोठा गुन्हा आहे.

हे सर्व दोष टाळण्याचा प्रयत्न सत्याग्रह आश्रम अहमदाबाद येथून गांधीजींनी केलेला आहे. आज आपण पाहत आहोत भारतात शेती क्षेत्राचा GDP मधील वाटा कमी - कमी होत आहे. त्याचे मुळ कारण गांधीजींनी 3 जुलै 1917 मध्ये शिक्षण पध्दती आणि चिरस्थायी आर्थिक विकास या भाषणात सांगितले आहे. गांधीजींनी सांगितलेल्या तत्वांचा अवलंब आपण केला पाहिजे ते तत्व म्हणजे शेती आधारित शिक्षण पध्दती आणि शेती मधून उत्पादित होणाऱ्या मालावर आधारित उद्योगांची निर्मिती होय. यातुन मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल. शेतीत दिसून येत असलेली छुपी बेकारी कमी होण्यास मदत हाईल यासाठी गांधीजींनी सत्याग्रह आश्रम अहमदाबाद येथून 13 वर्षाच्या अभ्यासक्रमात या सर्व बाबी शिकविल्या जात होत्या. आज ती आवश्यकता असल्याचे दिसून येते.

विद्यालयातील शिक्षक व आर्थिक बाब

महात्मा गांधीजींनी 23 जून 1917 रोजी अहमदाबाद येथे विद्यालय सुरू करण्यासाठी सर्व शिक्षकांना एकत्रीत करून देश सेवेसाठी आपल्याला काय - काय करता येईल यावर संभाषण केले.



Scanned with OKEN Scanner

त्यात त्यांनी असा उल्लेख केला की, आपल्याजवळ आश्रमाच्या निधीत (सत्याग्रह आश्रम अहमदाबाद) 10,000/- रुपये आहेत. त्याशिवाय मी जेव्हा भारताकडे यावयास निघालो तेव्हा मला मिळालेले जडजवाहीर व इतर देणग्या 20,000/- रुपये किंमतीच्या आहेत. त्याशिवाय एका मित्राने जमीन खरेदी करून दान देण्याचे वचन दिले आहे. त्या जमिनीची किंमत 10,000/- रुपये होईल अशा प्रकारे आपल्याजवळ आहे. एकुण 40,000/- रुपये आहेत. या शिवाय आपण येथून पुढे जनतेकडे जी मदत मागणार आहोत ती मिळाली नाही आणि सध्या आहेच तीच स्थीती चालु राहिली तरी चार वर्षे आपल्या गरजा भागवण्याइतका पैसा आपल्या जवळ आहे. आपल्याला जरूर तितका पैसा मिळेल असा मला विश्वास आहे. तथापि असेही घडेल की, आपण आपल्या तत्त्वनिष्ठेमुळे इतर सर्वांना नाखूष करू आणि आपल्याला काहिच पैसा मिळणार नाही.

अशा वेळी शिक्षकांपुढे दोन मार्ग मोकळे राहतील, एक म्हणजे ते शाळा सोडतील आणि दुसरे काम पाहतील. या दृष्टीने आपला चरितार्थ चालविता येणार नाही. इतका कुचकामाची तुमच्या मध्ये कोणीही नसेल. दुसरा मार्ग म्हणजे काहीही झाले तरी विद्यालय चालवावयाचेच आणि त्यासाठी जरूर पडली तर, साधी मीठ भाकरी खाऊन जगावयाचे पैशासाठी भीक मागण्याची पाळी आली तरी तुम्ही ती मागावी. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे विद्यालयासाठी भिकारी बनण्याची तुमची तयारी असली पाहिजे.

थोडक्यात गांधीजींच्या मते, शिक्षकांनी देशसेवेसाठी पैशाकडे न पाहता स्वतःला सेवेच्या कार्यात वाहून घेतले पाहिजे. त्यासाठी स्वतः गांधीजींनी त्यांच्याकडे असलेल्या मौल्यवान वस्तू व रोकड स्वरूपात असलेली रक्कम विद्यालयाच्या उभारणीसाठी समर्पित करून स्वतः शिक्षकांसमोर आदर्श (Role Model) झाले होते. आजच्या शिक्षकांनी गांधीजींच्या या आदर्श प्रतिमानाचा काही प्रमाणात जरी अवलंब केला तर भारतातील वंचित बहुजनांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटेल.

**निष्कर्ष**

महात्मा गांधीजींना प्रत्येक मानसाच्या राष्ट्र भक्तीतून सामाजिक आर्थिक राजकीय व धार्मिक या सर्व बाबींचा विकास अपेक्षित होता. त्यासाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले. सहाकरी चळवळ

उभारली ती केवळ उभारलीच नाही तर ती चळवळ नैतिकदृष्ट्या शुध्द कशी राहिल, यासाठी प्रयत्न केले शिक्षकांच्या व विद्यालयांच्या माध्यमातून जनता सुशिक्षित करता येईल. देश कसा उच्च शिक्षितांचा आणि आत्मा कसा शांत केला जाईल याकडे प्रकर्षाने लक्ष दिले.

स्त्रियांचे कर्तव्य, स्वदेशी, बलिदान, स्वार्थत्याग आणि शिस्त, गरीबीचे उन्मुलन क्षेत्रीय संतुलन यासारख्या बाबीवर प्रकर्षाने विचार मांडून ते जनतेमध्ये रुजवण्याचे काम महात्मा गांधीनी केले. त्यातुन त्यांची शुध्द राष्ट्रभक्ती किती प्रखर होती हे दिसून येते.

आजच्या परिस्थितीचा विचार करता जगात नैतिकतेचे अधपतन झाले त्यामुळे हिंसाचार वाढला त्याचे रुपांतर दहशतवादात झाले जगासमोर आज जे जे प्रश्न निर्माण झाले ते सर्व प्रश्न गांधीजींचे विचार आत्मसात न केल्याने त्यांची उपेक्षा केल्याने व अंमलबजावणी न केल्याचे दिसुन येते. म्हणुनच संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे 15 जुन 2007 रोजी ऐतिहासीक ठराव संमत करण्यात आला व आंतरराष्ट्रीय अहिंसा दिवस जाहिर करण्यात आला. यासाठी 91 देशातील नेते आणि 122 संघटनांच्या प्रतिनिधींनी आजच्या स्थितीत जगाला गांधी विचारांची आवश्यकता असल्याचे मान्य केले. व तसे प्रतिपादित करून जगाला गांधीवादाकडे नेण्यासाठी एक महत्वपूर्ण पाऊल टाकले.

संदर्भ ग्रंथ

१. प्रसिध्दी विभाग महाराष्ट्र राज्य (जानेवारी 1915-ऑक्टोंबर 1917) : "महात्मा गांधी यांचे संकलित वाड्मय", खंड - 13, संचालक प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई- 1.

२. भिसे आर. एम. (ऑक्टोंबर 2012): "वर्तमान परिस्थिती महात्मा गांधीजींच्या विचारांची आवश्यकता", प्रशांत पब्लिकेशन्स, जळगांव

३. प्रसिध्दी विभाग महाराष्ट्र राज्य जुलै - नोव्हेंबर 1920): "महात्मा गांधी यांचे संकलित वाड्मय", खंड - 18, संचालक प्रसिध्दी विभाग, महाराष्ट्र सरकार, मुंबई - 1.